**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेच्या अंमलबजावणीकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र.संकिर्ण ०६२६/प्र.क्र.११७/२-स**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ११.०६.२०२६

**प्रस्तावना -:**

मा. मंत्रिमंडळाच्या दि. ०२.०६.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेस मंजूरी देण्यात आली आहे. सदर मंजूरीस अनुसरुन दि. ०२.०६.२०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर योजनेअंतर्गत राज्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांना रुपये दोन लाखापर्यंत कर्जमाफी व कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये पन्नास हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. अशा रितीने लाभ देताना शेतक-यांच्या कर्जखात्यांची बँकांकडून प्राप्त माहितीच्या आधारावर, योजनेच्या निकषानुसार पात्र शेतक-यांना कर्जमुक्ती, एकवेळ समझोता (OTS) किंवा प्रोत्साहनपर लाभ देणे अभिप्रेत आहे. त्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद | सदस्य |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. | सदस्य |
| ४. | व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक. | सदस्य |
| ५. | जिल्हा समन्वयक, व्यापारी बँका. | सदस्य |
| ६. | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था | सदस्य सचिव |

२. उपरोक्त समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल.

१. योजनेअंतर्गत लाभास अपात्र असलेल्या महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत / जिल्हा परिषद / पंचायत समितीचे पदाधिकारी, सदस्य, अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती योजना पोर्टलवर अपलोड करण्याच्या प्रक्रीयेचे संनियंत्रण करणे.

२. आधार लिंक नसलेल्या कर्ज खात्यांची यादी प्रसिध्द करणेबाबत प्रेस नोट देणे.

३. योजनेअंतर्गत लाभास पात्र असलेल्या शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करणे.

४. ॲग्रीस्टॅक रजिस्ट्रिवर शेतकऱ्यांची नोंदणी करण्याकरीता मेळावे आयोजित करणे व त्यास प्रसिद्धी देणे.

५. शेतकऱ्यांच्या आधार प्रमाणीकरणाकरिता जिल्हयात मेळावे आयोजित करणे व प्रसिध्दी देणे.

६. तक्रार निवारण करणे.

७. योजनेस जिल्हा स्तरावर प्रसिद्धी देणे.

३. उपरोक्त समिती योजनेची अंमलबजावणी पुर्ण होईपर्यंत कार्यरत राहील.

४. उपरोक्त समितीने तिच्या कामकाजाचा अहवाल शासनास व सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांना वेळोवेळी सादर करावा.

५. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०६१११९१२३४२००२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB176442575037160FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.06.11 19:13:48 +05'30'

**( संतोष पाटील )**
**अपर निबंधक तथा सहसचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव
२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) जिल्हाधिकारी (सर्व)
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद (सर्व)
५) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था. (सर्व)
६) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,. (सर्व)
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. (सर्व)
८) व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक (सर्व)
९) जिल्हा समन्वयक, व्यापारी बँका (सर्व)
१०) निवडनस्ती (कार्यासन २-स).